

# का
# ल्होबाची
# जनिशी

गो. परांजपे

BVBK-0402801

2009



# एका कोल्होबाची रोजनिशी

ल. गो. परांजपे

ज्योत्स्ना प्रकाशन

BVBK-0402801

मूल्य पाच रुपये

ज्योत्स्ना प्रकाशन

प्रकाशक
ल. गो. परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
३० सी, खोताची वाडी
गिरगाव, मुंबई ४०० ००४


पुणे शाखा
६१७, नारायण पेठ
पुणे ४११ ०३०

© ज्योत्स्ना प्रकाशन

नविन सुधारीत आवृत्ती
मार्च १९९१

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

# १. कोल्होबाची मुलाखत



एक होता कोल्हा. मोठा लबाड, धूर्त नि हुषार. रोज माझ्या ऊसाच्या शेतात येई, ऊस खाई आणि निघून जाई.

एकदा मी त्या कोल्ह्याला पकडले नि ठेवले कोंडून!

पुढे मी त्याच्याकरिता एक स्वतंत्र पिंजरा

तयार केला. लाकडी पिंजरा नि त्याला लोखंडी गज! आत बसायला मुबलक जागा. झोपायला मऊ मऊ बिछाना. खायला भुईमुगाच्या शेंगा, ऊस नि काकड्या.

काम नाही, धाम नाही. दिवसभर खावे-प्यावे नि खुशाल झोपावे.

अशी चैन होती कोल्होबाची.

एके दिवशी मी या कोल्होबाची मुलाखत घेतली.

मी त्याला विचारले,

"काय कोल्होबा, कसे काय?

बरे आहे ना?"

'हो, हो, बरे आहे.' कोल्होबा उत्तरले.

"तुमचे नाव सांगा पाहू. तुम्ही कोठे राहता? काय करता? तुमची आवड-निवड काय? तुम्ही मोठे लबाड नि हुषार आहात असे

ऐकतो. खरे का हे? सांगाल का आम्हाला सारे?" मी विचारले.

माझ्या प्रश्नाला होकारार्थी मान हालवून कोल्होबांनी संमती दिली. त्यावेळी कोल्होबा मोठे खुषीत दिसत होते.

मी त्याच्या पुढ्यात भुईमुगाच्या चार शेंगा टाकल्या, तशी स्वारी आणखी खूष झाली. मग शेंगा खात कोल्होबा आपली माहिती सांगू लागले.

---

## २. कोल्होबाची ओळख

माझे नाव कोल्होबा. मी साधारण कुत्र्यासारखा दिसतो. पण माझे तोंड जरा निमुळते आहे. नाहीतर मी हुबेहूब कुत्र्यासारखाच दिसलो असतो.

मी अंगाने अगदी रोड नाही. एकदम

लठ्ठंभारतीही नाही. मध्यम बांधा नि रंगाने भुरकट तपकिरी असा मी आहे. उंचीनेही तसा फार नाही, साधारण कुत्र्या-मांजराएवढा आहे म्हणाना!

मी एखाद्या झाडाच्या ढोलीत राहतो. उसाच्या नाहीतर भुईमुगाच्या शेताच्या आसपास राहणे मला फार आवडते.

खाण्याच्या बाबतीत बोलाल तर मला नको असे काही नाही. मी म्हटले तर शाकाहारी आहे, म्हटले तर मांसाहारी आहे. शेंगा, ऊस, गाजरे, काकड्या, द्राक्षे, भाजीपाला सारे काही मला चालते. त्यातल्या त्यात शेंगा नि ऊस मला फार आवडतो. कधीकधी शिळे मांसही मी खातो.

शिकारीची मला मुळीच हौस नाही. स्वतः होऊन शिकार करणे मला तर मुळीच्च जमत

नाही, पण दुसऱ्याने केलेली शिकार कशी पळवावी ते मला चांगले माहीत आहे.

मी मोठा धूर्त नि कावेबाज आहे. वाघा-सिंहाने शिकार करावी नि मी टिकोजीरावाने ती आयती खावी, असे पुष्कळ वेळा झाले आहे. असा एकही प्राणी नाही, की मी त्याला हातोहात फसविले नाही.

सिंह जंगलाचा राजा खरा, पण त्यालाही मी हातोहात चकविले आहे. वाघाची खोड तर अनेक वेळा मोडली आहे. हत्तीलाही फसविले आहे. जंगलचा न्यायनिवाडा मी केला आहे.

अगदी बिनतोड न्याय!

अशा किती गोष्टी म्हणून सांगू?

## ३. कोल्होबाची रोजनिशी

"मला लिहिता-वाचताही चांगले येते. आम्हा कोल्होबांची अशी निराळी भाषा व निराळी लिपी आहे. मी त्या भाषेत एक रोजनिशी लिहिली आहे. तुम्हाला येईल का ती वाचता?" कोल्होबाने मधेच मला विचारले.

नंतर त्याने कागदाचे एक खूप मोठे भेंडोळे माझ्या हातात दिले नि कोल्होबा मला म्हणाला,

"वाचा हे सारे. यात सारे काही आहे. अडेल तेथे मला विचारा. खास मुलांसाठी मी ही रोजनिशी लिहिली आहे. आवडते का पाहा."

मी ते भेंडोळे माझ्या हातात घेतले नि वाचू लागलो. पाहतो तो साराच कागद आतून-बाहेरून कोरा.

मी विचारले, "कोल्होबा, हे काय? हा काय प्रकार? ही कसली रोजनिशी? या पांढऱ्यावर

जरासुध्दा काळे केलेले नाही."

त्यावर कोल्हा हसून म्हणाला, "आमची जशी लिपी नि भाषा निराळी तशी लिहिण्याची रीतही निराळी आहे म्हटलं! तुम्ही माणसे पांढऱ्याचे काळे करता तर आम्ही कोल्हे काळ्याचे पांढरे करतो."

असे म्हणून तो खूप मोठ्याने हसला. मग मला म्हणतो कसा,

"अहो राव, तो मूळचा कागद काळा आहे म्हटलं. त्यावर पांढऱ्या शाईने मीच लिहिले आहे. तुम्हाला नाही ते वाचता येणार. आणा तो कागद इकडे. मी तुम्हाला वाचून दाखवितो."

असे म्हणून माझ्या हातातून त्याने तो कागद जवळजवळ काढूनच घेतला.

## ४. कोल्होबाचे बालपण

कोल्होबा वाचू लागले—

'विलासपूर' या नावाचे एक खेडेगाव आहे. नदीकाठावर वसलेले. एक सुंदर गाव. फळाफुलांनी बहरलेले. मोठी आंबराई. नारळी-पोफळीच्या बागा. खूप मोठी शेती. भरपूर ऊस नि शेंगा. दरवर्षी खूप भाजीपाला पिके. आमची चंगळ होऊन जाई.

या गावात एका शेताच्या बांधाला लागून एक मोठे वडाचे झाड होते. तेथे एक ढोली होती. त्या ढोलीत मी आणि माझी आई राहात होतो.

माझे सारे बालपण या विलासपुरात गेले. अगदी मजेत.

सुखाने राहात होतो मी त्यावेळी!



रात्रभर खूप उनाडावे, शेतात जावे, भरपूर ऊस खावा शेंगा खाव्या. आज मधुर द्राक्षे खावीत, तर उद्या कोवळ्या लुसलुशीत काकड्या खाव्यात घटाघट नदीचे पाणी प्यावे नि आईच्या कुशीत येऊन दिवसा डाराडूर झोपावे.

रोज सारखी काही ना काही दंगामस्ती चालू असायची. पण चुकूनही माझी आई मला कधी बोलली नाही.

फार लाडका होतो मी तिचा.

## ५. आईची शिकवण

आई माझी फार काळजी घेई. मला लिहितावाचता यावे म्हणून तिने एक मास्तरही ठेवला होता. ती मला म्हणे,

'बाळ साक्षर हो. लिहायला शिक. वाचायला शिक. आळसात वेळ घालवू नको. कधी रिकामा बसू नको. आळस फार वाईट.

सबंध दिवस काम करावे. काही तरी वाचावे. थोडेबहुत लिहावे नि मग खूप खेळावे.'

असे रोज काही ना काही ती मला शिकवी.

माझी आई स्वत: साक्षर नव्हती. पण मी साक्षर व्हावे असे तिला वाटे.

असे बरेच दिवस गेले. मलाही थोडी अभ्यासात गोडी वाटू लागली. मी चांगला लिहू-वाचू लागलो. आमची स्वतंत्र लिपी नि भाषा तर मला चांगली येऊ लागली. शिवाय



सरावाने मानवी भाषासुध्दा मला चांगली समजू लागली. मी आता मानवी भाषेत चांगला बोलू शकतो. पण त्याची देवनागरी लिपी तेवढी मला कळत नाही.

पुढे काही वर्षांनी माझ्या आईने या जगाचा निरोप घेतला आणि मी अगदी पोरका झालो.

मला फार दु:ख झाले. घरी मला एकट्याने करमेनासे झाले. रोज आईच्या आठवणी येऊ लागल्या.

## ६. रोजनिशी लेखन

सबंध रात्र उनाडक्या करण्यात कशीतरी निघून जाई. पण दिवस मात्र मला खायला येई. सबंध दिवस ढोलीत मिटीमिटी बसून राहावे लागे. बरे, दिवसा बाहेर पडायची सोय नाही. शिकारी कुत्रे नि ती दुष्ट माणसे मागे लागतील, ही भीती. संबंध दिवस ढोलीत बसून काय करावे असा मला प्रश्न पडला. तोच एके दिवशी मला एक युक्ती सुचली.

एक बिनतोड शक्कल! नामी युक्ती! त्या आनंदात मी टुणकन उडी मारली नि ढोलीबाहेर गेलो. लगेच कागदाचे एक भेंडोळे मी घेऊन आलो.

माझ्या हातातील तो कागद कोळशासारखा काळा होता. त्या कागदावर वडाच्या पांढऱ्या



चिकाने मी लिहिले. साळुंकीचे पीस मला लेखणी म्हणून उपयोगी पडले.

आता माझा वेळ हा-हा म्हणता जाऊ लागला. रात्रभर खूप मजा करावी नि दिवसभर या ढोलीत बसून लिहावे. काही जुन्या आठवणी लिहाव्या, रोजच्या गमती जमती लिहाव्या.

'हे पाहा माझे रोजनिशीचे पहिले पान-' असे म्हणून कोल्होबाने फिरून एक कागद

माझ्या हातात दिला नि स्वारी दिलखुलास हसली.

मीही कौतुकाने ते पान हातात घेऊन मनोमन म्हटले,

'वा! छान. कोल्होबाच्या रोजनिशीची प्रस्तावना तर बहारदार झाली बुवा!'


---

## ७. आंबट द्राक्षे

रोजनिशीचे एकेक पान हातात घेऊन कोल्होबा वाचू लागले.

संध्याकाळची वेळ होती. मला फार भूक लागली होती. खायला काही मिळते का पाहावे म्हणून मी बाहेर पडलो. फिरत फिरत मी एका द्राक्षांच्या मळ्यात आलो.

पाहतो तो मांडव उंच. मांडवावर रसाळ द्राक्षांचे घड लोंबत होते. पण द्राक्षे चटकन्



मिळण्यासारखी नव्हती.

मी खूप खटपट केली. उंच उड्या मारल्या. पण द्राक्षे माझ्या हाताला काही केल्या लागेनात. शेवटी मी कंटाळलो नि मनात म्हटले, 'अरे! ही द्राक्षे तर आंबट आहेत. आपण उगाच एवढी मेहनत केली.'


## ८. कावळ्यांची फजिती

द्राक्षांच्या मळ्यातून मी बाहेर पडलो. या वेळी शेताच्या बांधांच्या कडेने मी जात होतो, तोच दुरून मला एक कावळा येताना दिसला. त्या कावळ्याच्या तोंडात एक मांसाचा तुकडा होता. तो पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटले.

इतक्यात तो कावळा एका उंच झाडावर जाऊन बसला. मी त्या झाडाखाली गेलो नि म्हणालो,

'कावळेदादा, कावळेदादा, तुम्ही किती छान दिसता. तुमचा रंगही फार मनोहर आहे बुवा. तुमचा आवाजही फार गोड आहे. एक सुरेख गाणे म्हणता का?'

माझे हे बोलणे ऐकून कावळा फार खूष झाला. तो लगेच गाऊ लागला.



'का ऽ का ऽ' असे करताच त्याच्या चोचीतला मांसाचा तुकडा खाली पडला.

मी लगेच तो उचलला नि खाऊन टाकला. नंतर कावळ्याकडे बघून म्हटले,

'कावळेदादा, आता बसा खुशाल गात. येतो मी. राम राम!'

# ९. सिंहाला चकविले

एका रानात एक सिंह राहात असे. जंगलातील जनावरांना तो फार त्रास देई. रोज खूप जनावरे मारून खाई. आमच्या जंगलातील सारी जनावरे त्याला भिऊन वागत.

एके दिवशी जंगलातील पशूंनी एक सभा घेतली. सिंहाने रोज अनेक जनावरे मारून खाण्यापेक्षा आपण आळीपाळीने त्याच्या गुहेत जाणे बरे, असे मी सुचविले. तसेच सिंहाने शिकारीकरिता गुहेबाहेर पडू नये. तरच आम्ही पशू काटेकोरपणाने हा नियम पाळू असे सर्वानुमते ठरले.

सिंहाला तसे कळविण्यात आले. त्याने सुद्धा ती गोष्ट मान्य केली.

झाले, सिंहाचे आयतेच फावले. शिकारीकरिता बाहेर पडण्याचे आता त्याला

कारण राहिले नाही. ठरल्याप्रमाणे रोज एकेक जनावर येऊ लागले.

एके दिवशी माझ्यावर पाळी आली. आता काय करावे? असा मला प्रश्न पडला. पण मी घाबरलो नाही. जरा डोके खाजवले नि एक नामी युक्ती शोधून काढली.

मी काय केले की, सिंहाकडे जायला खूप उशीर केला. त्यामुळे त्याला कडकडून भूक लागली.

मी दबकत दबकत त्याच्या गुहेत प्रवेश केला. सिंहाची गुहा म्हणजे मृत्यूचा जबडाच तो! मला पाहताच स्वारी गुरगुरली. पण तो काही बोलणार तोच नम्रपणे त्याच्यासमोर उभा राहिलो आणि हात जोडून म्हणालो,

'महाराज, काय करावे? मला उशीर झाला खरा. पण नाईलाज आहे. वाटेत एका भल्या

मोठ्या सिंहाने मला अडविले नसते तर खास वेळेवर हजर झालो असतो.

'महाराज, मला क्षमा करा.

तसेच माझी अशी नम्र विनंती आहे की, प्रथम आपण त्या सिंहाचा समाचार घ्यावा नि मग मला खावे.'

माझे हे साळसूदपणाचे बोलणे सिंहाला खरे वाटले. त्याने रागाने जमिनीवर शेपूट आपटले. थोडा गुरगुरला नि मला म्हणाला, 'चल दाखव पाहू कोठे आहे तुला अडविणारा तो सिंह?'

मी गालातल्या गालात हसलो नि निमूटपणे रस्ता चालू लागलो. सिंह माझ्या मागोमाग आला. मी त्याला एका विहिरीपाशी नेले नि दूर उभा राहिलो.

विहिरीकडे बोट दाखवून म्हटले, 'त्या गुहेत तो सिंह लपून राहिला आहे.'

सिंहाने त्या विहिरीत डोकावून पाहिले. पाहतो तो खरेच. तेथे एक खूप मोठा सिंह त्याला दिसला. मोठे रागीट डोळे, खूप मोठी आयाळ, लांब लांब मिशा.

सिंहाने शेपटी उभारून त्याच्यावर पंजा उगारला, तोच आतील सिंहाने तसेच केले.

मग सिंह खूप रागावला. त्याने खूप मोठ्याने गर्जना केली नि विहिरीत उडी मारली.

विहिरीतला सिंह काही त्याला मिळाला नाही. पण शेवटी बिचारा स्वतःच पाण्यात बुडून मेला.



## १०. बिनतोड न्याय

आज मी एका न्यायाधिशाचे काम केले. एका दुष्ट वाघोबाला पिंजऱ्यात अडकवून अगदी बिनतोड न्याय दिला नि एका गरीब माणसाचे प्राण वाचविले. गंमत अशी झाली की, एका मोठ्या पिंजऱ्यात वाघोबा अडकले होते. काहीकेल्या त्याला बाहेर पडता येईना. इतक्यात तेथून एक माणूस जात होता. तो होता भोळा. त्याला पाहून वाघ म्हणाला, 'मला सोडवशील का रे बाबा? मी काही तुला खाणार नाही, मारणार नाही. अगदी देवाची शपथ घेतो.'

वाघ खूप गयावया करू लागला. रडू लागला, शेवटी त्या भोळ्या माणसाला त्याची दया आली. त्याने पिंजऱ्याचे दार उघडले.

झाले.

वाघ मोकळा झाला. पिंजऱ्याबाहेर आला. परंतु तो पडला दुष्ट. मोठा कपटी.


मोकळा झाल्यावर लगेच त्या माणसाला म्हणतो कसा, 'मला फार भूक लागली आहे. आता मी तुला खाणार.'

बिचारा माणूस खूप घाबरला. त्याने समजुतीच्या चार गोष्टी सांगून पाहिल्या. शेवटी मनधरणीही केली.

पण काही केल्या तो ऐकेना. मग खूप बोलाचाली झाली. मोठे कडाक्याचे भांडण झाले नि शेवटी निवाडा करण्यासाठी म्हणून ते दोघे माझ्याकडे आले.

मी प्रथम दोघांचे बोलणे नीट ऐकून घेतले व वाघोबाला म्हणालो,

'वाघोबा, तुम्ही सापळ्यात कोठे बसला होता ते प्रथम दाखवा पाहू?'



वाघोबा पिंजऱ्यात शिरले. तो आत जाताच झटकन मी पिंजऱ्याचे दार लावून घेतले.

वाघोबांना मी पिंजऱ्यात अडकविले व नंतर त्या भोळ्या माणसाकडे वळून म्हणालो,

'बाबा, दुष्ट प्राण्यावर कधीही दया करू नये. जा आता घरी.'

नंतर त्या वाघोबाकडे वळून मी म्हणालो,

'काय वाघोबा, कसे काय? बरे आहे ना?'

## ११. वाघोबाला फसविले

आज सबंध दिवस मी अगदी थकून गेलो. खायला काहीच मिळाले नाही. भूक फार लागली. काय करावे ते सुचेना.

नदीकाठाने हिंडतफिरत मी एका जंगलात आलो.

तेथे एक मेलेला बैल मला दिसला. खूप मोठा बैल. मनात म्हटले, बरे झाले. चार दिवस तरी चंगळ होईल.

मी बैलाजवळ गेलो. परंतु त्याचे कातडे पडले जाड.

मला काही ते फाडता येईना. आता काय करावे?

तोच समोरून वाघोबा येताना दिसले.

वाघ जवळ येताच मी म्हणालो, 'राम राम! दादा.'

वाघोबा थांबले.

त्याला तो मेलेला बैल दिसला. त्याच्या तोंडाला पाणी सुटले. तो म्हणाला,

‘कोल्होबा, हा बैल रे कोणी येथे मारून ठेवला?’

सिंह महाराजांनी. त्यांनीच तर मला येथे राखणीला बसवले आहे, आता एवढ्यात येतीलच बघा.’ — मी म्हणाला.

‘मला फार भूक लागली आहे रे. मी यातले थोडे मांस खाऊ का?’ विनवणीच्या सुरात वाघ म्हणाला.

‘हो चालेल.’

‘आपण असे करू, मी राहतो येथे उभा. तू बैलाचे पोट फाड नि मांस खा. सिंह येताच मी ओरडेन की तू पळ’ मी म्हणालो,

वाघाला माझे लटके बोलणे खरे वाटले.



तो बैलाचे पोट फाडू लागला. आपल्या अणुकुचीदार नखाने त्याने पोट फाडताच मी ओरडलो.

'वाघोबा पळा. आला सिंह.'

वाघोबा घाबरले नि धूम पळत सुटले.

नंतर पोटभर मांस मी खाल्ले नि सावकाश रमत गमत घरी आलो.

## १२. बैलाची खोड मोडली

आज मी एका उसाच्या मळ्यात आला. ऊस मला फार आवडतो. परंतु मळ्याचा राखणदार जवळच उभा होता. शेतात शिरावे कसे? तितक्यात तेथे उभा असलेला एक बैल मला दिसला.

लगेच मी त्याच्याजवळ गेलो. त्याला राम राम केला. त्याची स्तुती केली नि त्याला म्हटले,

'गड्या, तुलाही माझ्यासारखाच ऊस



आवडतो का रे? चल तर, त्या शेतात जाऊन आपण खूप ऊस खाऊ.'


'अरे तो राखणदार आहे ना तेथे. तो आपल्याला मारील.' तो बैल म्हणाला.

'त्याची नको तुला काळजी.'

आपण असे करू. प्रथम मी थोडा ऊस खातो. तू तो राखणदार येतो का लक्ष ठेव.

माझा ऊस खाऊन झाला की तू शेतात जा नि पोटभर ऊस खा, मी म्हणालो.

त्या बैलाला माझे बोलणे पटले.



झाले, मी प्रथम शेतात गेलो. खूप ऊस खाल्ला. नंतर बाहेर आलो नि बैलाला म्हणालो, 'गड्या, जा आता शेतात. मी करतो राखण.'

बैलोबा शेतात गेले.

बराच वेळ झाला. बैलाचे पोट मोठे. त्याचे पोट काही भरेना. ऊस खाणे काही संपेना.

मी खूप वाट पाहिली. मग मनात विचार केला, या हावरटाची चांगली खोड मोडावी. मग मी हळूच मळ्याच्या बाहेर गेलो.

'कुई कुऽई' असे मोठ्याने ओरडलो नि गेलो दूर पळून.

माझे ओरडणे ऐकून राखणदार हातात काठी घेऊन आला. त्याने त्या बैलाला खूप मार दिला.

मी एका झाडाआड लपून हे सारे पाहात होतो.

## १३. मी आणि करकोचा

एका नदीच्या काठी एक करकोचा रहात होता. मी त्याला चार गोष्टी सांगितल्या नि खूष केले.

बोलण्यात माझ्यासारखा चतुर नि मिठ्ठास प्राणी दुसरा मिळणार नाही. त्याला रानातल्या गमती-जमती सांगितल्या. तो अगदी खूष झाला. नंतर हळूच त्याला म्हणालो,

करकोचाभाऊ, नदीतील चार मासे मला द्या की खायला! मी आज तुमचा पाहुणा आहे. तुम्ही आहात माझे यजमान. मीही एक दिवस तुम्हाला भोजनाला बोलावीन नि गोड खीर करून घालीन.

मग करकोचाने मला खूप मासे खाऊ घातले. हळूहळू त्याची व माझी दाट मैत्री झाली. तो रोज मला मासे देऊ लागला. असे

बरेच दिवस गेले. माझी अगदी चंगळ उडाली होती. आता एकदा करकोचाला जेवायला बोलवावे असे मी ठरविले.


एके दिवशी मी त्याला भोजनाचे आमंत्रण दिले. त्याने येण्याचे कबूल केले.

मी करकोच्यासाठी खीर तयार केली. खिरीत खूप नारळ घातला. खूप गूळ घातला. अगदी गोड गोड खीर केली नि बसलो करकोच्याची वाट पाहात.

करकोचा आला. त्याला पाहताच मी म्हणालो, "भाऊ, बसा या पाटावर. खीर फार ऊन ऊन आहे. एका मोठ्या थाळीत निवत घातली आहे. निवली की खाऊ."

खीर निवली. खिरीचा गोड वास सुटला होता. माझ्याने आणखी धीर धरवेना.

"हं, भाऊ करा सुरुवात" असे म्हणून मी



लपालपा खीर खाऊ लागलो.

करकोचा पडला उंच, त्याला खाली वाकून भराभरा खीर खाणे जमेना. मी मात्र खिरीवर ताव मारला नि हां-हां म्हणता खीर संपविली.

खीर खाऊन झाल्यावर करकोचाकडे वळून साळसूदपणे मी म्हणालो,

'काय भाऊ, आवडली नाही का खीर? अरे तुला खीर आवडत नव्हती तर आधी का सांगितले नाहीस? मी खास तुझ्यासाठी माशांचे सांबार केले असते.'

## १४. बिचारा बोकड!

आज जंगलात गेलो.

एक हरीण मरून पडले होते. हरणाचे लुसलुशीत मांस खूप खाल्ले. अगदी पोटभर.

मग एक मोठी ढेकर देऊन मी घरी यावयास निघालो.

वेळ दुपारची होती. दिवस उन्हाळ्याचे. ऊन होते कडक.

चालता चालता मी थकून गेलो. मला तहान लागली. घसा सुकला.

इकडे तिकडे पाहू लागलो. परतु जवळपास पाणी मिळण्याचे चिन्ह दिसेना.

इतक्यात एक विहीर मला दिसली. लगेच मी धावलो, विहिरीत डोकावून पाहिले.

थोडे पाणी होते.

मी कसलाही विचार न करता आत उडी टाकली.

पाणी फार गोड होते.

पाणी प्याल्यावर मी वर येऊ लागलो. तो वर येता येईना.

खूप घाबरलो.

आता काय करावे?

तोच एक बोकड त्या विहिरीच्या काठावर आला. त्याला पाहताच मला आनंद झाला.

लागलीच मी त्याला म्हणालो,


'दादा, या की आत. पाणी पाहा किती गोड आहे! एकदम गारीगार आहे!'

काहीएक विचार न करता, त्याने लगेच विहिरीत उडी मारली.

बोकड विहिरीत उतरताच मी त्याच्या पाठीवर चढलो नि टुणकन काठावर आलो.

माझी झकास पैकी सुटका झाली नि बिचारा बोकड मात्र विहिरीत अडकला!

एवढे वाचून कोल्होबा खूप मोठ्याने हसला. नंतर माझ्याकडे वळून "आहे की नाही नामी युक्ती? द्या टाळी." असे म्हणून त्याने हात पुढे केला.



मीही देहभान विसरून खरोखरच त्याच्या हातावर टाळी मारली. इतका वेळ त्याचे रोजनिशीवाचन चालू होते. मी त्याला जराही अडथळा केला नाही. अखंडपणे तो वाचीत होता. मी मोठ्या तन्मयतेने ते ऐकत होतो.

"ही माझी रोजनिशी म्हणजे माझ्या काही ठळक आठवणी आहेत. तिथी व तारखा मला माहीत नाहीत. जसे घडले तसे मी लिहिले. रोज नेमाने लिहिले म्हणून मी याला रोजनिशी म्हणतो. तुम्ही माणसे याला आठवणी म्हणा किंवा आणखी काही म्हणा." कोल्होबा म्हणाले.

नंतर एक क्षणभर कोल्होबा थांबले. त्याने थोडा विचार केला. जरा गालातल्या गालात हसून माझ्याकडे वळून तो म्हणाला,

"ही माझी सबंध रोजनिशी नाही बर का! ही अपुरी आहे. याची काही पाने माझे घरकुलात राहून गेली आहेत.

माझे घरकूल काही फार लांब नाही. असेल येथून दोन हाकांच्या अंतरावर.

मला जरा मोकळे करता का? आ.ा घेऊन येतो बघा."

कसा कोण जाणे, कोल्होबाच्या या बोलण्यावर मी भरवसा ठेवला खरा नि केले पिंजऱ्यातून मोकळे. म्हणालो, "कोल्होबा, लवकर या बर का!"

'आता येतो' म्हणून सांगून जे कोल्होबा निघून गेले, ते गेलेच.

कोल्होबा काही परत आले नाहीत.

आज त्या गोष्टीला बरोबर एक वर्ष झाले!

☆ ☆ ☆


2009

बा. वा.

BVBK-0402801

**राजा मंगळवेढेकर**

सुलभ रामायण

सुलभ महाभारत

महारथी कर्ण

**सौ. विद्या पराजपे**

भागवतातील गोष्टी

**वामन देशपाण्डे**

कथा सागतो श्रीकृष्णाची

**बा. वा. फाटक**

पितामह भीष्म

बलशाली भिमसेन

**शशिकात कदम**

गुरू द्रोणाचार्य

**प्र. ग. सहस्त्रबुद्धे**

महाभारतातील नीतीकथा


**जोत्स्ना प्रकाशन**

३ - सी, खोताची वाडी,

गिरगाव, मुबई ४००००४